MHAU110000252026

**किरकोळ दि.अर्ज क्र. १४/२०२६**
**गंगुबाई ताठे व इतर वि. महाराष्ट्र शासन तर्फे**
**कलेक्टर औरंगाबाद**

**निशाणी १ वरील आदेश**

अर्जदार यांनी हा अर्ज वारस प्रमाणपत्र (Legal Heirship certificate) अर्जदार यांचे नावे मिळण्यासाठी केला आहे.

२. अर्जदारांचे प्रकरण असे की : मयत नामे नारायण रखमाजी ताठे यांचा दि. १७.०७.२०१४ रोजी मौजे वाकोद ता. फुलंब्री जि. छ. संभाजीनगर येथे मृत्यू झालेला आहे. मयत नारायण रखमाजी ताठे हे अर्जदार क्रं. १ चे पती व अर्जदार २ ते ७ यांचे वडील आहेत. त्यातील अर्जदार क्रं. २, ४ आणि ६ हे मुले आणि अर्जदार क्रं. ३,५ आणि ७ हया मुली आहेत. त्यामुळे अर्जदार हेच मयत नारायण रखमाजी ताठे यांचे वारस असल्याबाबत प्रमाणपत्र मिळावे.

३. अर्जदार हे मयत नारायण रखमाजी ताठे यांचे कायदेशीर वारसदार असुन त्यांना इतर कोणतेही वारस नसल्याबाबत अर्जदारांनी सदरचे अर्ज व पुरावा प्रतिज्ञालेखा कथन केले आहे. त्यानंतर **दैनिक लोकपत्र** या वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिध्द करण्यात आली. तसेच जिल्हा अधिकारी कार्यालय, तहसिल कार्यालच्या नोटीस बोर्डवर नोटीस डकवुन ३० दिवसांच्या आत आक्षेप मागविण्यात आले. परंतु, आजपावेतो कुणाचा काही आक्षेप आलेला नसल्याचे अभिलेखावरुन आढळते.

४. अर्जापुष्ठ्यर्थ अर्जदार क्रं. २ यांनी त्याचे साक्षशपथपत्रे दाखल केले असून अर्जकथने पुनरुच्चारित केली आहेत. याशिवाय अर्जदार यांनी पुढील कागदपत्रांच्या प्रती दाखल केल्या आहेत : मयत नारायण रखमाजी ताठे यांचे मृत्यु

प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत, अर्जदार यांच्या आधार कार्डची प्रमाणित प्रत आणि पुरावा बंद पुरशीस दाखल केलेले आहे.

५. अर्जदाराकडुन मयत नारायण रखमाजी ताठे यांचे मृत्यु प्रमाणपत्र अभिलेखावर सादर करण्यात आले. त्यानुसार दि. १७.०७.२०१४ रोजी मयत नारायण रखमाजी ताठे यांचा मृत्यु झाला असल्याचे दिसुन येते. तसेच दि. १२.०२.२०२६ चे **दैनिक लोकपत्र** या वृत्तपत्रात जाहीर प्रगटण प्रकाशीत झाल्याचे दिसुन येते. परंतु आजपावेतो अर्जदार यांच्या अर्जास कोणाचाही आक्षेप आलेला नाही. त्यायोगे सदर अर्जदार हे मयत नारायण रखमाजी ताठे यांचे वारस असल्याचे अविवादित राहिल्याचे आढळुन येते.

६. उपरोक्त सर्व बाबींचे एकत्रित अवलोकन करता, अर्जदार हेच मयत नारायण रखमाजी ताठे यांचे वारस असल्याचे अविवादीत राहील्याचे दिसुन येते. अर्जदारांच्या नावे मयत नारायण रखमाजी ताठे यांचे वारस म्हणुन वारस प्रमाणपत्र (Legal Heirship Certificate) जारी करणे उचित होईल.

७. यास्तव, मी खालील आदेश पारीत करीत आहे. :

## <u>आदेश</u>

१) अर्जदार क्रं १ ते ७ हे मयत नारायण रखमाजी ताठे यांचे कायदेशिर वारस असल्याबाबत प्रमाणित करण्यात येत आहे.

२) अर्जदार यांच्या नावे स्वतःसाठी वारस प्रमाणपत्र (Legal Heirship Certificate) त्यांनी आवश्यक ते कोर्ट फी/शुल्क जमा केल्यानंतर जारी करण्यात यावे.

३) सदर प्रमाणपत्र हे वारस प्रमाणपत्र असल्यामुळे त्याचा वापर केवळ शासकीय आदी कार्यालयात अर्ज दाखल करणेपुरता मर्यादीत राहिल. त्याद्वारे अर्जदार यांना चल, अचल मिळकत, शासकीय निधी, रक्कम प्राप्त करण्याचा अधिकार येणार नाही.

RITA SHESHRAO KULKARNI

Digitally signed by RITA SHESHRAO KULKARNI
Date: 2026.05.08 16:43:42 +0530

दि. ०८.०५.२०२६

(डॉ. आर.एस.कुळकर्णी)
दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
फुलंब्री.

**प्रमाणपत्र**

मी अधिकथन करते की, या पी. डी. एफ. करुन अपलोड केलेल्या आदेशामधील शब्द–नि–शब्द हे मूळ आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | एस.बी.आहेर |
| न्यायालयाचे नाव | : | न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, फुलंब्री |
| आदेशाची तारीख | : | ०८.०५.२०२६ |
| आदेशावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | ०८.०५.२०२६ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | : | ०८.०५.२०२६ |